# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक २३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ४/९/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १०१७**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. २४/८/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिका दरवर्षी विकासकामे करणेसाठी डी.एस.आर. अंतिम करत असते. डी.एस.आर. अंतिम झालेनंतर त्याच्या दरास अनुसरुन निविदा प्रक्रिया राबविली जाते. दरवर्षी १ एप्रिल पासून आर्थिक वर्ष सुरु होत असून १ एप्रिल नंतर विकासकामांची प्रक्रिया पुणे महानगरपालिकेत सुरु केली जाते. परंतू डी.एस.आर.जर अंतिम झाला नसेल तर विकासकामांची प्रक्रिया करणे अडचणीचे ठरते. सबब याचा परिणाम हा शहरातील विकासकामे, देखभाल दुरुस्तीची कामे यांच्यावर होत असतो.

सन २०१८–२०१९ हे आर्थिक वर्ष सुरु होवून ६ महिने उलटूनही अद्यापही अनेक विकासकामांच्या निविदा प्रक्रिया डी.एस.आर.अंतिम नसल्याने राबविता आल्या नाहीत. वर्षामध्ये १२ महिने असून मा.सभासदांना वर्षातील जास्तीत जास्त ४ महिनेच कामासाठी वेळ मिळतो. यामुळे विकासकामे, देखभाल दुरुस्तीची कामे प्रलंबित राहून नागरिकांचे रोषास सामोरे जावे लागते. डी.एस.आर. अंतिम न झाल्याने अनेक विकासकामांची प्रक्रिया वेळेत न झाल्याने अनेक मा.सभासदांनी प्रभागातील विकासकामांसाठी केलेली तरतुद लॅप्स होते.

तरी दरवर्षी ३१ मार्चला म्हणजेच आर्थिक वर्ष सुरु होण्याआधीच पुढील वर्षाचा डी.एस.आर. अंतिम करण्यात यावा. ३१ मार्चला म्हणजेच आर्थिक वर्ष सुरु होण्याआधीच पुढील वर्षाचा डी.एस.आर. अंतिम न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी.

**विषय क्र. १०१८**

मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि. २७/८/२०१८ चे पत्र.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ ‘‘अ’’ मध्ये झालेली सुधारणा या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेने अंमलबजावणी करण्याबाबत.

सन २००८ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम २६७ अ हे नव्याने समाविष्ट करुन, त्याद्वारे महानगरपालिका हद्दीतील जी बांधकामे, बांधकाम खात्याची विहित परवानगी न घेता, अथवा बांधकाम खात्याने निश्चित केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करुन बांधकाम केलेले असल्यास, अशा बांधकामांना अनुसेय होणाऱ्या मिळकतकरांच्या दुप्पटी इतकी शास्ती लावण्याची तरतूद करण्यात आलेली आहे, त्यानुसार आत्तापर्यंत अनेक मिळकतींना तीनपट कराची आकारणी करण्यात आलेली आहे. यामुळे अनेक मिळकतीधारक तीनपट मिळकतकर जमा करीत नाहीत.त्यामुळे त्यावर दरमहा २% चक्रीवाढ व्याज वाढत आहे. यामुळे थकबाकींच्या फुगवट्यात रोज वाढ होत आहे. या सर्व गोष्टींमुळे अनेक नागरिक त्यांच्या बांधकामांना/मिळकतींना मिळकतकर लावून घेण्यासाठी महानगरपालिकाकडे येत नाहीत. यामुळे थकबाकींचा फुगवटाही वाढत जातोय व नवीन मिळकतींना नागरिक टॅक्स लावून घेत नाहीत. असे दोन्ही बाजूंनी महानगरपालिकेचे मोठे नुकसान होत आहे.

सध्याच्या परिस्थितीमध्ये निवासी वापर असलेले व ६०० स्के. फूट पेक्षा कमी असलेल्या मिळकतींना एकपट ६०१ ते १००० स्के. फूट निवासी मिळकतींना दिडपट व त्यापुढील क्षेत्राच्या मिळकतींना तीनपट शास्ती आकारण्यात येते. तसेच मान्य बांधकाम नकाशाप्रमाणे असलेल्या मिळकतींना तीनपट शास्ती मधून वगळण्यात आले आहे, परंतु त्याचा सर्व मिळकतधारकांना फायदा/उपयोग होत नाही.

वरील कलमांमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६७ अ मध्ये बदल झालेला असून, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी, थकबाकींचा फुगवटा दूर करण्यासाठी या बांधकामांना दुप्पट शास्ती लावण्याऐवजी, किती शास्ती लावावयाची हे ठरविण्याचे अधिकार स्थानिक ठिकाणच्या महानगरपालिकांना म्हणजेच मा. मुख्य सभेस देण्यात आलेले आहेत.

तरी, याबाबतची कार्यवाही प्रशासनाने त्वरीत सुरु करुन योग्य त्या समिती मार्फत मा. मुख्य सभेपुढे सदरचे विषयपत्र दाखल करावे.

**विषय क्र. १०१९**

मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि. २८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १० क शास्त्रीनगर परिसर व भुसारी कॉलनी परिसर येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्त करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड : ZE16B102/SD2-1770<br>प्रभाग क्र. १० क इंदिरा शंकर नगरी जवळील नाला चॅनेलायझेशन करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १० क शास्त्रीनगर परिसर व भुसारी कॉलनी परिसर येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्त करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०२०**

मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि. २८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १० क मध्ये खालील विविध विकास काम करणेसाठी र.रू. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१)बजेट कोड : CE27A241/SJ24-322, प्रभाग क्र. १० क उजवी भुसारी कॉलनी येथील सावरकर मैदान व परिसरात विविध झाडे लावणे व सुशोभिकरण करणे | १० लाख | --- |
| २) बजेट कोड : FE17A277/SY1-111, प्रभाग क्र. १० क मध्ये कचरा संकलनासाठी ढकलगाडी खरेदी करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१) प्रभाग क्र. १० क मध्ये विविध ठिकाणी बेंचेस बसविणे | --- | ५ लाख |
| २) प्रभाग क्र.१० क मध्ये भुसारी कॉलनी व बावधन परिसरात ओपन जिम बसविणे | --- | ५ लाख |
| ३) प्रभाग क्र.१० क मध्ये कचरा संकलनासाठी बकेट खरेदी करणे | --- | ५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०२१**

मा.संजय घुले यांचे दि. २८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २६ड हडपसर स.नं.४८ येथे नव्याने गार्डन विकसीत करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१) बजेट कोड : CE20A1262/SA15-2085, प्रभाग क्र. २६ड एनआयबीएम परिसरातील रस्ता यु टी डब्ल्यू टी पध्दतीने तयार करणे | १० लाख | --- |
| २) बजेट कोड : CE20A1196/C2-255, प्रभाग क्र. २६ड कृष्णानगर येथे रस्ता करणे | ५ लाख | --- |
| ३) बजेट कोड : CE17A227/SJ12-211, प्रभाग क्र. २६ड कौसरबाग दफनभूमी येथे विविध विकासाची कामे करणे | १० लाख | --- |
| ४) बजेट कोड : CE17A227/SJ12-212, प्रभाग क्र. २६ड स.नं.५७ येथे हिंदू स्मशानभूमी विकसित करणे | १० लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| ५) बजेट कोड : CE22A548/SJ10-1039, प्रभाग क्र. २६ड ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध ठिकाणी स्टेनलेस स्टीलची बाकडी बसविणे<br>६) बजेट कोड : CE20A176/W2-407, प्रभाग क्र. २६ड कृष्णानगर गल्ली क्र. ५ व ६ येथे रस्ता विकसित करणे | ५ लाख<br>१० लाख | ---<br>--- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २६ड हडपसर स.नं.४८ येथे नव्याने गार्डन विकसीत करणे | --- | ५० लाख |

**विषय क्र. १०२२**

मा.युवराज बेलदरे यांचे दि. २८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ४० अ मध्ये त्रिमुर्ती चौक ते दत्तनगर जाणारा राजमाता भुयारी मार्गावरील सुरक्षा भिंत बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड : CE20E101/SF1-399, प्रभाग क्र. ४० अ मधील चंद्रभागानगर परिसरात पावसाळी लाईन टाकणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ४० अ मध्ये त्रिमुर्ती चौक ते दत्तनगर जाणारा राजमाता भुयारी मार्गावरील सुरक्षा भिंत बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १०२३**

मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ११ ब मध्ये खालील विविध विकास काम करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, शहरामध्ये विविध ठिकाणी सिमाभिंत बांधणे, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे.(यादी क्र.एसजे-१०),<br>१) पान क्र.२५६, अ.क्र.४१५, प्रभाग क्र.११ब, संपूर्ण प्रभागातील विविध ठिकाणी पोलार्ड बसविणे | १० लाख | --- |
| २) पान क्र.२५६, अ.क्र.४१७, प्रभाग क्र.११ब, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्टेनलेस स्टिलची बाके बसविणे. | १० लाख | --- |
| ३)Pedestrian policy नुसार शहरातील फूटपाथ विकसित करणे. ( यादी क्र.एसए१३) पान क्र.१८१,अ.क्र.२६४, प्रभाग क्र.११ब, संपूर्ण प्रभागातील विविध ठिकाणी डिजीटल कार्विन बसविणे. | १० लाख | --- |
| शहरामध्ये शौचालये /मुताऱ्या बांधणे.( यादी क्र.एसजी२ ) पान क्र.२८२,अ.क्र.१९१ प्रभाग क्र.११ब,केळेवाडी व विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची दुरूस्ती विषयक कामे करणे. | २० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे-** | | |
| १) प्रभाग क्र.११ब,मध्ये विविध ठिकाणी समाज मंदिर बांधणे व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र.११ब,मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी बसणेसाठी कट्टा ( परगुले,वाचनालय ) बांधणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.११ब,मध्ये विविध गल्लीबोळांत कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.११ब, मध्ये नागरिकांना बसणेसाठी लोखंडी बेचेंस बसविणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १०२४**

मा.सौ.अल्पना वरपे यांचे दि. २९/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १० क मध्ये खालील विविध विकास काम करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>१)बजेट कोड नं.झेडई १६बी,१०२/एसडी २-१७६५,प्रभाग क्र.१०क गदिया इस्टेट भाग -१ येथे मुख्य मलवाहिनी टाकणे.<br>२) बजेट कोड नं.झेडई १६बी,१०२/एसडी २-१७६६, प्रभाग क्र.१०क गदिया इस्टेट भाग -२ येथे मुख्य मलवाहिनी टाकणे. | १५ लाख<br>१५ लाख | ---<br>--- |
| नविन सुचविलेली कामे<br>१) प्रभाग क्र.१०क कोथरुड व बावधन परिसरातील नाले साफसफाई करणे.<br>२) प्रभाग क्र.१०क शास्त्रीनगर कॅनल ,पीएमसी कॉलनी परिसरातील ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे.<br>३) प्रभाग क्र.१० क येथील कैलास वसाहत परिसरातील चेंबर दुरुस्त करणे,नवीन बांधणे व साफसफाई करणे | ---<br>---<br>--- | १० लाख<br>१० लाख<br>१० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १०२५**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील माहे जुलै २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-४/४१९ दि.२७/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १०२६**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील दि.१/४/२०१८ ते ३१/८/२०१८ दरम्यानची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/४२० दि.२७/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १०२७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे जुलै २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-५/४२३ दि.२७/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १०२८**

मोटार वाहन विभागाकडील दि.१/४/२०१८ ते ३१/८/२०१८ दरम्यानची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिमआ(वि)/४२४ दि.२७/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १०२९**

दि. ६/८/२०१८ ते दि. १२/८/२०१८ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/४२५ दि. २७/८/२०१८ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १०३०**

दि. १३/८/२०१८ ते दि. १९/८/२०१८ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/४२६ दि. २७/८/२०१८ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १०३१**

कर आकारणी व कर संकलन विभागाकडील कागदपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१४३२ दि.२८/३/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३७ सन २०१७–२०१८ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/४३२ दि.२८/८/२०१८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्र. १०३२**

भवन रचना कार्यालयाकडील कागदपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/६५२ दि.१९/५/२००४ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ७१ सन २००३–२००४ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/४३३ दि.२८/८/२०१८ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १०३३**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने परवाने देणे आणि त्यांचेकडे खाद्य पदार्थाची तपासणी करण्याचे अधिकार पुणे महानगरपालिकेकडे देणेबाबत मा.प्रमोद (नाना) भानगिरे यांचे दि.४.९.२०१७ चे पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १२९ दि.१६/९/२०१७ ला अनुसरुन झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९०१ दि.२६/९/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/एचओ/४१४ दि.२३/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १०३४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १०३५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १०३६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १०३७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १०३८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १०३९**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १०४०**

पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांनी शासकीय इमारतींवर रुफ टॉप सोलर सिस्टीम बसविणेसाठी काढलेल्या SECI/C&P/MNRE/1000/MWRT/IND/122016 या टेंडर नुसार यशस्वी कंपन्यांकडून पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर RESCO (Renewable Energy Service Companies) मॉडेल पध्दतीने ग्रीड कनेक्टेड रुफटॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेचे काम मे.टीईपी सोलर इंडिया मॉरिशस यांच्या वतीने मे.महाराष्ट्र रेस्को रुफ टॉप सोलर प्रा.लि. यांच्याकडुन करुन घेणेसाठी मे.महाराष्ट्र रेस्को रुफ टॉप सोलर प्रा.लि. यांना कार्यादेश देणेस, त्यांचेसोबत पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट करणेस व प्रत्यक्ष वीजनिर्मितीनुसार र.रुपये ३.६२ प्रती युनिट या दराने बिल आदा करणेस मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यवाही केल्याची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/४११ दि.२१/८/२०१८ चे पत्र

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १०४१**

सन २०१८–२०१९ या आर्थिक वर्षात व त्या पुढील काळात पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने पुणे शहरात रात्र–निवारा प्रकल्प राबविणेकामी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सविवि/४१७ दि.२३/८/२०१८ चे पत्र.

१. सन २०१८–२०१९ ते २०२०–२०२१ या तीन आर्थिक वर्षांकरीता पुणे शहरात पुणे महानगरपालिका व खालील स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने रात्र–निवारा प्रकल्प राबविणेस.

| अ. क्र | संस्थेचे नाव व पत्ता |
|---|---|
| १. | जॉन पॉल स्लम डेव्ह. प्रोजेक्ट एम–३९/१६३९महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे –६ |
| २. | पुणे युथ फाउंडेशन , स.नं. १३, बनकर कॉलनी, आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे –२८ |
| ३. | जान्हवी फाउंडेशन<br>अ)स.नं. ५१/१/१ गांगुर्डेनगर, बोपोडी, गुरव पिंपळे, पुणे –२७<br>ब)स.नं. ५७/२/१/ विलोचन रेसिडेंन्सी, फ्लॅट नं.१, ए–विंग, ज्ञानदिप शाळेजवळ, मानाजी नगर, नऱ्हे, पुणे |
| ४. | ओ.बी.सी. सेवा संघ,<br>अ.मोतीनगर, रजपूत एस.टी.डी. कोळपेवाडी, ता. कोपरगाव, जि. अ. नगर<br>ब. १२९/ब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बोपोडी, पुणे –४११०२० |

२. अ. क्र. १ प्रमाणे संस्थांबरोबर दरवर्षी करारनामा करणेस.

३. सदरचा खर्च करण्यासाठी सन २०१८–१९या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील ४ क युवक कल्याणकारी योजना निधी अंतर्गत FE14D122 (शहरात विविध ठिकाणी नाईट शेल्टर योजना राबविणे) या अर्थशिर्षकावर रक्कम रू. १,००,००,०००/– उपलब्ध आहे. सदर तरतूदीमधून खर्च करणेस. तसेच दरवर्षी वरील अर्थशिर्षकावर तरतुद करणेस व खर्च करणेस.

४. वरील संस्थांनी समाधानकारकरित्या काम केले नाही तर त्यांचा करारनामा रद्द करणेस व त्या ठिकाणचे काम प्रतिक्षा यादीवरील संस्थेस देणेस.

५. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या तक्त्यानुसार नेमणूक केलेल्या व्यक्तींना/संस्थांना धनादेशाद्वारे मानधन अदा करणेस.

६. मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांच्या वतीने मुख्य समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांना रात्र निवारा (नाईट शेल्टर) प्रकल्प प्रत्यक्ष राबविताना प्रत्यक्ष परिस्थितीनुसार आवश्यकते योजनेच्या अंमलबजावणीचे तसेच आवश्यकते प्रकल्पाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीमध्ये बदल करण्याचे अधिकार देणेस.

७. मे. शासनाचे मान्यता मिळाल्यानंतर सदरचे रात्र निवारा प्रकल्पदिवस–रात्र प्रकल्पांमध्ये रूपांतरीत करणेस व त्यासाठी मे. शासनाकडून प्राप्त झालेला निधी सदर प्रकल्पांसाठी खर्च करणेस.

८. भविष्यामध्ये शासनाच्या आदेशानुसार व निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार रात्र निवारा(नाईट शेल्टर) प्रकल्प शहराच्या अन्य भागामध्ये राबविण्यास सदरहू संस्था तयार असल्यास त्यांच्याकडून वा अन्य संस्थांकडून किमान वेतन दरानुसार निश्चित करण्यात आलेल्या रक्कमेनुसार प्रकल्प राबविण्यास.

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**